आई स्वतंत्र नाही,
आम्ही मुले कशाला?
आईस सोडवाया,
येणार कोण बोला?

## अंतरंग...


दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

प्रस्तावना...

लेखकाचे मनोगत...

| | |
|---|---|
| १) प्रकाशवेधाची दिशा | १५ |
| २) अंधार पडलाच कसा? | २० |
| ३) अंधारयुगातील ठिणग्या | २५ |
| ४) पडघम संघर्षाचे | ३२ |
| ५) जागृत सातारा | ४१ |
| ६) क्रांतिसिंहांचा सिंहनाद | ४९ |
| ७) नऊ ऑगस्टचा लोकलढा | ५६ |
| ८) चले जाव मोर्चा पर्व | ६३ |
| ९) ब्रिटिश दडपशाहीचा वरवंटा | ७० |
| १०) आंदोलन पेटलं | ७४ |
| ११) क्रांतिकारी सशस्त्र लोकशक्तीचे संघटन | ७७ |
| १२) साताऱ्यातील सशस्त्र गट संघटन | ८३ |
| १३) वसंतदादांचा आक्रमक गट | ८९ |
| १४) प्रतिसरकारची उदय पूर्व अवस्था | ९२ |
| १५) क्रांतिकाळातील प्रतिसरकारे | ९८ |
| १६) क्रांतिवादाचे सप्तरंगी इंद्रधनुष्य | १०५ |
| १७) सातारा-सांगलीचं वारं | १०९ |
| १८) क्रांतिसिंहानी सांगितलयं | ११२ |
| १९) पूर्वसंध्येवर | ११६ |
| २०) उदयाचलावर | १२१ |
| २१) प्रतिसरकारचे शपथग्रहण | १२६ |
| २२) सातारच्या प्रतिसरकारची रचना | १३२ |
| २३) प्रतिसरकारचे स्वरूप | १३६ |
| २४) सातारचे प्रतिसरकार | १३९ |
| २५) खऱ्याखुऱ्या लोकस्वातंत्र्याच्या शोधात | १४५ |
| २६) सातारचे प्रतिसरकार-वर्गक्रांतीची पहाट | १४८ |

## प्रस्तावना...

"एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात नवस्वतंत्र विकसनशील राष्ट्रांचे नेतेपद भारताकडे आलेले असेल." असा दावा भारतातील आर्थिक विकासाचे दावेदार एका बाजूला करीत आहेत तर दुसऱ्या बाजूला,

"उष:काल होता होता काळ रात्र झाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली."

असे आवाहनही तितक्याच गांभीर्याने व पोटतिडकीने केले जात आहे.

या विरोधाभासाच्या पाठीशी आधार आहे तो पुन: एकच आणि तो म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीशी भारतीय जनतेने दीड-दोनशे वर्षे जो आगळा-वेगळा असा लढा लढविला त्याची उद्दिष्ट्ये हा.

भारतीय भूखंडात भारत हा आधुनिक एकसंघ राष्ट्राची उभारणी करून मानव मुक्तीच्या जागतिक पातळीवरील विकास मोर्चाच्या अग्रभागी रहायचे हे या उद्दिष्टाचे सार होते. दीड-दोनशे वर्षांचा कालखंड, किमान चार पिढ्यांचा सहभाग आणि अनेकविध प्रेरणा असे या समग्र लढ्याचे अंतरंग असल्यामुळे अनेक पदरी गोफ विणण्याची एक आश्चर्यजनक कृती या लढ्यात भारतातील सामान्य जनतेने सक्रिय सहभागानिशी पार पाडली आहे.

अर्थात या अनेकपदरी गोफाचा मुख्य पीळ ब्रिटिश साम्राज्यातून मुक्त होणे हे उद्दिष्ट हा असला तरी हा मुक्त भारत आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक या क्षेत्रात कोणते रूप धारण करणार आणि कोणती कामगिरी पार पाडणार या विषयीच्या उद्दिष्टांत भिन्नता होती. एवढेच नव्हे तर तीव्र असे अंतर्विरोधही होते. हे सर्व अंतर्विरोध पोटात घेऊन हा लोकलढा साम्राज्यसत्तेपासून भारताला मुक्त करण्यात यशस्वी झाला. हा इतिहास बनला आहे. मात्र हे अंतर्विरोध मिटण्याऐवजी तीव्र होऊ लागले हे गेल्या पन्नास वर्षातले वर्तमान आहे आणि उद्याच्या भविष्याचेही अंतरंग या अंतर्विरोधाच्या सोडवणुकीशी जोडलेले आहे.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची, विशेषत: या लढ्याच्या मागील प्रेरणा आणि त्यामधील क्रियाशील प्रवाह यांची चांगली जाण असल्याशिवाय आणि आल्याशिवाय आजच्या वर्तमानाचा आणि उद्याच्या भविष्याचा उलगडा होणे